# मंत्रिमंडळ निर्णय

२१ ऑगस्ट २०१४

( मंत्रिमंडळ बैठक क्र.१८१ )

| क्र. | विषय | विभाग |
| --- | --- | --- |
| १ | नांदेड गुरुद्वारा मंडळ स्थापन करण्याचा मार्ग मोकळा<br>न्या. भाटिया समितीचा अहवाल राज्य मंत्रिमंडळाने स्वीकारला | महसूल |
| २ | राज्य कामगार विमा योजनेतील<br>७० अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सेवा नियमित | सार्वजनिक आरोग्य |

## नांदेड गुरुद्वारा मंडळ स्थापन करण्याचा मार्ग मोकळा
## न्या. भाटिया समितीचा अहवाल राज्य मंत्रिमंडळाने स्वीकारला

नांदेड येथील हजूर सचखंड गुरुद्वाराचा कारभार पहाणाऱ्या मंडळाची नियुक्ती करण्याबाबत राज्य शासनाने नेमलेल्या न्यायमूर्ती जे. एच. भाटिया यांचा अहवाल राज्यमंत्रिमंडळाने आज स्वीकारला. यामुळे १९५६ सालचा याबाबतचा कायदा रद्द होऊन नवीन कायदा अस्तित्वात येणार आहे. मंडळाच्या नव्या रचनेत २१ शीख सदस्य असतील. त्यापैकी १९ सदस्य निवडणुकीद्वारे तर २ सदस्य शासनामार्फत नामनिर्देशित होतील. नांदेडच्या जिल्हाधिकाऱ्यांचाही या मंडळावर समावेश असेल. या मंडळात निर्वाचित सदस्यांपैकी ९ सदस्य नांदेड जिल्ह्यातील असतील. या निर्णयामुळे शीख समाजाची दीर्घकाळ प्रलंबित मागणी मान्य झाली आहे.

नांदेड येथील सचखंड श्री हजूर अपचलनगर साहीब गुरुद्वारा या गुरुद्वाराचा कारभार दि नांदेड शीख गुरुद्वारा सचखंड श्री हजूर अपचलनगर साहीब अधिनियम १९५६ नुसार चालविला जातो. या अधिनियमात गुरुद्वाराचा कारभार पाहण्यासाठी १७ सदस्यीय मंडळ स्थापन करण्याची तरतूद आहे. २००० मध्ये गैरकारभाराच्या मुद्यावरुन नांदेड येथील गुरुद्वारा मंडळ शासनाने बरखास्त केले आहे. तेव्हापासून शासन नियुक्त प्रशासक व प्रशासकीय समितीमार्फत गुरुद्वाराचा कारभार पाहिला जातो.

या कायद्यातील तरतूदींनुसार गुरुद्वारा मंडळ स्थापन करण्यासाठी संपूर्ण १७ सदस्यांची निवड होणे गरजेचे आहे. तथापि, काही तांत्रीक अडचणींमुळे संपूर्ण १७ सदस्यांची निवड होऊ न शकल्याने गुरुद्वारा मंडळाची स्थापना आजअखेर पर्यंत करता आली नाही. त्यामुळे स्थानिक शीख जनतेच्या मनात अस्वस्थता निर्माण झाली होती. सध्याचा कायदा १९५६ सालचा असल्यामुळे बदललेली परिस्थिती विचारात घेता गुरुद्वाराचा कारभार कार्यक्षमपणे चालविण्यासाठी तसेच काळाच्या ओघात झालेल्या बदलामुळे अधिनियमातील काही बाबी कालबाह्य झाल्या आहेत किंवा कसे याबाबत अभ्यास करुन शिफारशी करण्याकरीता न्या. जे. एच. भाटीया (सेवानिवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास समिती नियुक्त केली होती.

या समितीने आपला अहवाल दि.८ ऑगस्ट २०१४ रोजी शासनाला सादर केला. समितीने १९५६ चा अधिनियम कालबाह्य झाल्याने रद्द करून सुधारित प्रारुप अधिनियम प्रस्तावित केलेला आहे. सुधारित अधिनियमाप्रमाणे १७ ऐवजी २१ सदस्यांचे मंडळ असेल. त्यापैकी १८ सदस्य निवडणुकीद्वारे निवडले जातील. त्यापैकी ९ प्रतिनिधी नांदेड जिल्ह्यातील असतील. २ सदस्य महाराष्ट्र शासनाकडून नामनिर्देशित, तर एक सदस्य शिरोमणी गुरुध्दारा प्रबंधक कमिटी अमृतसर यांच्याकडून नामनिर्देशित केला जाईल. निवडून येणाऱ्या सदस्यांपैकी ४ सदस्य महिला प्रवर्गातील असतील. जिल्हाधिकारी नांदेड वगळता उर्वरित सर्व सदस्य “शीख” असतील.

मंडळ तसेच व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी अधीक्षक आणि गुरुद्वाराचे कर्मचारी यांना भारतीय दंड संहितेतील व्याख्येनुसार “लोकसेवक” समजण्यात येईल. या मंडळावर जिल्हाधिकारी, नांदेड यांनाही प्रतिनिधीत्व देण्यात आले आहे. अशा समितीच्या सर्वसाधारण शिफारशी आहेत. या अहवालातील शिफारशी आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत स्वीकारण्यात आल्या.

-----o-----

## राज्य कामगार विमा योजनेतील
## ७० अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सेवा नियमित

राज्य कामगार विमा योजनेमध्ये अस्थायी स्वरुपात कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्याचे सार्वजनिक आरोग्य विभागातील मंजूर पदांवर कायमस्वरुपी समावेशन करण्यास राज्य मंत्रिमंडळाने आज मान्यता दिली.

राज्य कामगार विमा योजनेतंर्गत महाराष्ट्र वैद्यकीय विमा सेवा गट अ व ब या संवर्गात वैद्यकीय अधिकारी हे राजपत्रित पद महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील आहे. ही योजना सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीत असून राज्यात १३ रुग्णालये व ६९ सेवा दवाखाने कार्यरत आहेत. या पदांवर लोकसेवा आयोगाकडून उमेदवार उपलब्ध करून दिले जातात. मात्र आयोगाने शिफारस करूनही अनेक उमेदवार शासन सेवेत रुजू होण्यास उत्सुक नसतात. यामुळे ही पदे प्रदीर्घ काळ रिक्त राहत असत. यामुळे विभागाने वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या वेळोवेळी अस्थायी स्वरुपात नेमणुका केल्या. सद्य:स्थितीत गट अ वर्गातील ६९ पदे व गट ब मधील एक पद अस्थायी स्वरुपात भरण्यात आले आहे. या सर्व ७० वैद्यकीय अधिकाऱ्यांना सार्वजनिक आरोग्य विभागातील मंजूर पदावर कायम स्वरुपी सामावून घेण्यात आले. तसेच ही पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यकक्षेतून वगळण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला.

-----०-----